
दै. मराठवाडा दि. ०४/०७/२५

# लाखाचे बक्षीस असलेल्या ठगास ठोकल्या बेड्या

## स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई; तीन वर्षापासून होता फरार



नांदेड (प्रतिनिधी) – महाराष्ट्र राज्य अन्नदाता सेवा केंद्राच्या माध्यमातून गोरगरीब जनतेला अन्नधान्य आणि शासकीय अनुदान मिळवून देतो म्हणून तब्बल पावणेदोन कोटी रूपयांना ठकविणाऱ्या ठगास नांदेडच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बेड्या ठोकल्या आहेत. या आरोपीवर तब्बल एक लाख रूपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते, अशी माहिती पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दिली आहे.

औंढा नागनाथ येथील रहिवासी बाबासाहेब शंकर सुतारे आणि सोनाली विजयराव बाजड यांनी छत्रपती शिवाजी महाराज बहुउद्देशीय संस्था धार संचालित महाराष्ट्र राज्य अन्नदाता सेवा केंद्र या संस्थेच्या माध्यमातून गोरगरीब जनतेला अन्नधान्य मिळवून देण्याचे आमिष दाखविले होते. यासाठी सुतारे याच्याकडून विविध प्रकारच्या बनावट योजना राबविण्यात आल्या होत्या. केवळ ११०० रूपयांमध्ये दर महिन्याला ३० किलो गहू, २५ किलो तांदूळ, १० किलो साखर दहा, १ किलो पोहा, ५ किलो शेंगदाणे, उर्वरित २० किलो गहू तसेच बाराशे रूपयांमध्ये ६० किलो गहू, २५ किलो तांदूळ असे अन्नधान्य वाटप करण्यात येत असल्याबाबत सांगितले होते. तसेच ३० हजार रूपयांमध्ये इलेक्ट्रिक स्कुटी, बावीसशे रूपयांमध्ये शिलाई मशीन आणि सायकल लॅपटॉप दिले जाईल. विधवा महिलांसाठी बाराशे रूपये भरल्यानंतर एका वर्षासाठी दहा हजार रूपये प्रति महिना विधवा पेन्शन योजना लागू केली जाईल. अशा विविध माध्यमातून खोटा प्रचार आणि प्रसार करून फिर्यादीला सदर संस्थेत काम करणारे जनसंपर्क अधिकाऱ्यांमार्फत संस्थेला पैसे भरलेल्या हजारो लाभार्थ्यांना ठेव म्हणून जमा केलेल्या रकमेच्या बदल्यात परतफेड म्हणून धान्य आणि इतर साहित्य वाटप करण्यास नकार देऊन कपटीपणा केला. संस्थेकडे विश्वासाने ठेवलेल्या रकमेचा अपहर करून स्वत:साठी वापर करून फिर्यादीची आणि संस्थेची कामे करणारे जनसंपर्क अधिकारी तसेच लाभार्थ्यांची एकूण १ कोटी ८५ लाख ३७ हजार ७५४ रूपयांची रक्कम फसवणूक केली असल्याबाबत वजिराबाद पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

२०२३ मध्ये दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यानंतर आरोपी फरार होता. पोलिसांना गुंगारा देऊन तो सतत आपली जागा बदलत होता; मात्र पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी या आरोपीचा शोध घेऊन त्याला बेड्या ठोकाव्यात असे आदेश दिले होते. दरम्यान, तत्पूर्वी सदरील आरोपीवर एक लाख रूपयांचे बक्षीसही जाहीर करण्यात आले होते.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे यांच्या टीमने आरोपीला अखेर ताब्यात घेतले आहे. शिवाय आरोपी बाबासाहेब सुतारे याची सयोगी सोनाली बाजड हिलाही लातूर येथून अटक करण्यात आली आहे.

**एकूण १३ आरोपी**

सदर गुन्ह्यात एकूण १३ आरोपी होते. यापूर्वी चार आरोपींना गुन्ह्यात अटक करण्यात आलेली असून, सहा आरोपींची जमानतीवर सुटका करण्यात आली होती. एक आरोपी मयत झालेला आहे. तब्बल दोन कोटी रूपयांचा नागरिकांना चुना लावणाऱ्या आरोपी बाबासाहेब सुतार याला स्थानिक गुन्हे शाखेने अखेर बेड्या ठोकल्या आहेत.